SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR
416 004, MAHARASHTRA
PHONE:EPABX–2609000,www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर ४१६ ००४, महाराष्ट्र
दूरध्वनी - ईपीएबीएक्स - २६०९०००, www.unishivaji.ac.in,
E-mail : affiliation.t2@unishivaji.ac.in
संलग्नता टी २ विभाग थेट दूरध्वनी क्र. ०२३१ - २६०९०९१, २६०९१३५

Estd. 1962
"A++" Accredited by
NAAC(2021)
With CGPA 3.52

जा.क्र. शिवाजी वि/संलग्नता टी-२/परिपत्रक/ No 966 दि. 30 MAR 2026

# :: परिपत्रक क्र. १::

प्रति,
मा. प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

विषय:- सन २०२६-२७ करिता संलग्नीकरणासाठी पाठविण्यात येणाऱ्या समितीवर ICT च्या माध्यमातून प्रक्रिया राबवणेसाठी सुधारीत प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' ऑनलाईन नमुणे भरणेबाबत...

संदर्भ:- या कार्यालयाचे जा.क्र.शिवाजी वि/संलग्नता टी-२/परिपत्रक/०९४८, दि.१७ मार्च, २०२६ रोजीचे परिपत्रक.

महादोय/महोदया,

उपरोक्त विषयास व संदर्भास अनुसरुन आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षा पासून संलग्नीकरणासाठी प्राप्त प्रस्तावाच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या स्थानिक चौकशी समितीच्या अहवालाचे नमुनेबाबत ICT च्या माध्यमातुन प्रक्रिया राबविणेसाठीची कार्यपध्दती निश्चित करण्यात आली आहे. यानुसार सदर स्थानिक चौकशी समिती अहवाल ऑनलाईन सादर करण्याकरिता महाविद्यालयांकडून प्राप्त प्रस्तावांचे संलग्नीकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्तार याबाबतचे सुधारीत प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' भरणेसाठीची लिंक दि.१७.०३.२०२६ पासून दि.३१.०३.२०२६ पर्यन्त सुरु ठेवून सर्व महाविद्यालयांना प्रपत्र भरण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापी, काही महाविद्यालयांच्या मागणीनुसार सदरची मुदत **दि.०१.०४.२०२६ पासून दि.०८.०४.२०२६ पर्यन्त** सुरु ठेवण्यात येत आहे.

सबब, सन २०२६-२७ करिता आपल्या महाविद्यालयांचे संलग्नीकरणाचे नुतनीकरण व नैसर्गिक विस्तार बाबतच्या प्रपत्र 'अ', 'ब' व विद्याशाखानिहाय 'क' प्रस्तावांची कार्यवाही विहित वेळेत पूर्ण करणेत यावी. जेणेकरुन शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासूनच्या संलग्नीकरणाचे पत्र मिळणेस विलंब होणार नाही. अन्यथा जी महाविद्यालये प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' बाबतची माहिती विद्यापीठास ऑनलाईन पध्दतीने विहित वेळेत सादर करणार नाहीत, अशा महाविद्यालयांच्या संलग्नीकरणाच्या नुकसानीस सर्वस्वी संबंधीत महाविद्यालय जबाबदार राहिल. याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आदेशान्वये,
PSPandav
डॉ. पी. एस. पांडव
उपकुलसचिव
संलग्नता टी-२ विभाग

टिप :-

१. व्यावसायीक शाखा वास्तूशास्त्र साठी प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' हे स्वतंत्र आहेत. तसेच व्यावसायीक पदवी पदव्युत्तर बी.बी.ए., बी.सी.ए., एम.बी.ए. व एम.सी.ए. साठी प्रपत्र 'अ', 'ब' हे एकच आहेत व प्रपत्र 'क' हे स्वतंत्र आहेत, याची नोंद घ्यावी व ते स्वतंत्र भरण्याबाबत काळजी घ्यावी.
२. सुधारीत प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' बाबतची माहिती व सोबत ऑनलाईन पध्दतीने जोडण्यात येणारी कागदपत्रे, फोटो व व्हिडीओ दिलेल्या सूचनेनुसार अपलोड करण्यात यावेत. जर माहिती अपूर्ण किंवा चूकीच्या पध्दतीने किंवा तीच-तीच कागदपत्रे सादर केलेली आढळल्यास सर्वस्वी संबंधीत संस्था / महाविद्यालय जबाबदार राहिल.
३. प्रपत्र 'अ', 'ब' व 'क' भरताना कोणत्याही प्रकारची तांत्रिक अडचण उद्भवल्यास संगणक केंद्र व संलग्नता टी-२ विभागाशी संपर्क साधावा.